न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# हवा प्रदूषणासाठी कारणीभूत दोन आरएमसी प्लँट चालकाला 'दणका'

## आमदार महेश लांडगे यांचे मंत्र्यांना पत्र : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाची कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात हवा प्रदूषणाची पातळी वाढली असून, ठोस उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतली असून, वाकड परिसरात हवा प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या दोन आरएमसी प्लँट चालकांना नोटीस बजावली आहे. तसेच, संबंधित प्लँक कायमस्वरुपी बंद करण्याचा इशारा दिला आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने शहरातील हवा प्रदूषणाच्या मुद्यावर राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना आमदार महेश लांडगे यांनी पत्राद्वारे कारवाईची मागणी केली होती. काही दिवसांपूर्वी वाकड-ताथवडे- पुनावळे आणि हिंजवडी परिसरातील आयटीएन्सनी हवा प्रदूषणाच्या समस्येला वाचा फोडण्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते.



पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरात हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) सजीवांसाठी धोकादायक पातळीजवळ आहे. याबाबत महानगरपालिकेच्या पथकाने पाहणी केली. त्यामध्ये संबंधित आरएससी प्लँटमुळेच मोठ्या प्रमाणात धूळ येत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने निर्धारित केलेल्या कोणत्याही अटी व शर्तींचे पालन केले जात नाही, अशी बाब समोर आली आहे. महापालिका प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.

### फौजदारी गुन्हा दाखल करणार!

» महानगरपालिका अधिनियम, कलक 214 अनुसरुन पर्यावरणास हानी पोहोचवणारा आपला आरएसमसी प्लँट सील का करण्यात येवू नये? याबाबत 3 दिवसांत लेखी स्वरुपात कळवावा. अन्यथा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 376 (अ) नुसार फौजदारी गुन्हा दाखल करुन आपल्या उद्योगामुळे पर्यावरणाचे प्रदूषण होत असल्याने आपला आरएमसी प्लँट कायमस्वरुपी बंद करण्यात येईल, अशी नोटीस प्रशासनाने संबंधितांना पाठवली आहे.

"वाढते नागरिकरण आणि पर्यावरण संवर्धन याचे आव्हान मानवजातीसमोर आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरातील हवा प्रदूषणाची स्थिती दिवसेंदिवस धोकादायक पातळीच्या दिशेने सुरू आहे. काही दिवसांपूर्वी, कुदळवाडी येथील भंगार दुकानांवर अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली. त्यामध्ये हवा प्रदूषण, नदी प्रदूषण हा कळीचा मुद्दा होता. सामान्य नागरिकांना प्रदूषणमुक्त जीवनमान देण्यासाठी प्रशासन आणि आम्ही लोकप्रतिनिधी यांनी पुढाकार घेतला पाहिजे. आरएमसी प्लँटधारकांसह विविध व्यावसायिक, उद्योजकांनीही प्रदूषणाच्या मुद्यावर सतर्क आणि जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे.

- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा.

---

# तळेगाव-चाकण-शिक्रापूरसह हिंजवडीतील अतिक्रमण रडारवर

## दुसऱ्या टप्प्यात अतिक्रमण कारवाई 17 ते 30 मार्च 2025 पर्यंत चालणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पुणे शहर आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्याच्या अनुषंगाने संयुक्तपणे विशेष मोहीम हाती घेतली आहे. पहिल्या टप्प्यातील अतिक्रमणविरुद्ध मोहीम यशस्वी पूर्ण होत असून आता दुसऱ्या टप्प्याची आखणी १७ ते ३० मार्चदरम्यान करण्यात आली आहे. वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न निकाली काढण्यासाठी अनधिकृतपणे उभारलेल्या बांधकामांवर धडक कारवाई करत ते जमिनदोस्त करण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यात पीएमआरडीएच्या संयुक्त



कारवाईमध्ये पुणे शहर पोलीस, पिंपरी चिंचवड शहर पोलीस, पुणे ग्रामीण पोलीस, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीसी, एमआयडीसी, एमएसईबी आदी विभागांमार्फत ३ ते १३ मार्चपर्यंत २५०० पेक्षा अधिक अतिक्रमणांवर हातोडा फिरवण्यात आला आहे.

यासह अनेक स्थानिकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घेतली. या अतिक्रमणविरुद्धच्या मोहिमेचा पहिला टप्पा संपत आला असून दुसऱ्या टप्प्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात पुणे शहराच्या महामार्गासह मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणावर विविध शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून १७ ते ३० मार्चदरम्यान संयुक्तपणे कारवाई करण्यात येणार आहे. या कारवाईमध्ये महामार्ग व राज्यमार्ग रस्त्यालगत असणाऱ्या दुकाने, पत्राशेड, गाळे, टपरी व अनधिकृत बांधकामे काढण्यात आली आहे.

पुढील टप्प्यामध्ये संयुक्त कारवाई ही पुणे व पिंपरी चिंचवड शहरात वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे महामार्ग व रस्त्यांवर होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात अतिक्रमण कारवाई १७ ते ३० मार्च २०२५ पर्यंत चालणार आहे. त्यामुळे पीएमआरडीए, पुणे महापालिका, पिंपरी चिंचवड महापुलिका हद्दीतील रस्त्यांवरील अतिक्रमण धारकांनी स्वतः अतिक्रमणे काढून घेत प्रशासनास सहकार्य करावे, यासह कोणतेही बांधकाम पूर्वपरवानगी घेऊनच करावेत, असे आवाहन महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे.

### महामार्गाचे नाव, कारवाईची तारीख

» नवलाख उंब्रे ते चाकण :- दि. १७ ते ३० मार्च
» हिंजवडी परिसर :- माण :- दि. १७ ते ३० मार्च
» तळेगाव-चाकण-शिक्रापूर :- दि. १७ ते ३० मार्च

# पुरंदर विमानतळाची अधिसूचना अखेर जारी

## एमआयडीसीकडून सात गावांमधील क्षेत्र औद्योगिक म्हणून जाहीर



**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेला पुरंदर विमानतळाचा घोळ अखेर संपुष्टात आला असून, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमानुसार अधिसूचना जारी करण्यात आली आहे. त्यानुसार विमानतळासाठी ठरल्याप्रमाणे सात गावांमधील सुमारे २ हजार ८३२ हेक्टर जागा संपादित करण्यात येणार आहे. या गावांना औद्योगिक दर्जा देण्यात आला आहे. गावांमधील चतुःसीमाही निश्चित केल्या असून, जमिनीची मोजणी करून भूसंपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.

या विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, पारगाव मेमाणे, कुंभारवळण, एखतपूर, उदाची वाडी, मुंजवडी, खानवडी या सात गावांमधील एकूण २ हजार ८३२ हेक्टर जमिनीचे संपादन करण्यासाठी अधिसूचना जारी करणे गरजेचे होते. त्यानुसार उद्योग विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमानुसार हे क्षेत्र निश्चित केले आहे. या गावांना आता औद्योगिक क्षेत्राचा दर्जा देण्यात आला असून, रस्ते, पाणंद, ओढा या जागाही संपादित केल्या जाणार आहेत.

या सर्व सात गावांमधील चतुसीमाही निश्चित केल्या असून, या जमिनींवर एमआयडीसीचे शेरे मारण्यात येणार आहेत. भूसंपादनाबाबत एमआयडीसी व महसूल विभागाच्या बैठकीत कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल. त्यानंतर वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन त्याबाबत हरकती व सूचना मागविल्या जातील. त्यासाठी एक महिन्याचा कालावधी असेल. त्यानंतर जमिनीची मोजणी होऊन त्याच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली जाईल.


पुरंदर विमानतळाची घोषणा ऑक्टोबर २०१६ मध्ये केली होती. परंतु, त्याला सुरुवातीपासून विरोध झाला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात विमानतळाची जागा बदलण्यात आली होती. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतर पूर्वीच्या जागी विमानतळ होईल, हे घोषित करून पुढील पाच वर्षांत विमानतळ पूर्ण करण्याचे ठरविले. उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच मांडलेल्या अर्थसंकल्पात पुरंदर विमानतळासाठी कोणतीही तरतूद न केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात होते. मात्र, सरकारने आता अधिसूचना जारी केल्याने त्याबाबत एक पाऊल पुढे टाकले आहे.

### गावाचे नाव क्षेत्र (हेक्टरमध्ये)

- वनपुरी - ३३९
- कुंभारवळण - ३५१
- उदाची वाडी - २६१
- एखतपूर - २१७
- गुंजवडी - १४३
- खानवडी - ४८४
- पारगाव १०३७
- एकूण २८३२

# 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सव' 24 मार्चपासून तीन दिवस

## डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना राम नदी सेवक सन्मान प्रदान करण्यात येणार




**पुणे | प्रतिनिधी**

राम नदीशी नाते निर्माण व्हावे, तिच्या जैवविविधतेचा अभ्यास व्हावा आणि तिची स्वच्छता राखण्यासाठी तरुण पिढी प्रेरीत व्हावी या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या 'राम नदी पुनरूज्जीवन अभिमान' ला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली. हे औचित्य साधून पाचवा ऑनलाईन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सव' २४ मार्चपासून तीन दिवस दररोज एक तास प्रक्षेपित करण्यात येणार आहे.

सोलापूर येथील पर्यावरणतज्ज्ञ आणि राम नदी अभ्यासक डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांच्या भाषणाने २४ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता ऑनलाईन राम नदी महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. तर, महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते डॉ. बडगबाळकर यांना पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. वसुंधरा महोत्सवाचे अध्यक्ष आर. आर. देशपांडे, आनंद चितळे आणि डॉ. गुरुदास नूलकर उपस्थित राहणार आहेत. महोत्सवात राम नदी विषयक कल्पक उपक्रम, कार्यशाळा आणि निसर्ग परिक्रमांवर आधारित चित्रपटांचा समावेश या महोत्सवात करण्यात आला आहे. यात राम नदीची ओळख, सफर पाषाण येथील सोमेश्वर मंदिराची, राम नदीचे भूजल व्यवस्थापन या विषयांवर व्याख्याने होणार असल्याची माहिती महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव यांनी दिली.

महोत्सवात विजय परांजपे, ॲड. अनिल कोकाटे, परीणिता दांडेकर, सुरभी केसरवानी, विकास चौहान, प्राची क्षीरसागर, अश्विनी कुलकर्णी, डॉ. संजय खावट, डॉ. राजेंद्र सिंह, राजेश पंडित, धनंजय बेळे, डॉ. धनश्री हरदास, शगुन कपिल, उम्रा अनिस, फराज अहमद, सुनीता नरेन, राजीव कुमार मित्तल, के. अशोक नटराजन, विवेक घोडमारे, डॉ. अर्पित सिंग, के. जे. श्रीराम, मनीष मिश्रा यांचा सहभाग आहे.

### महोत्सवाची वैशिष्ट्ये

- किर्लोस्कर वसुंधराच्या फेसबुक पेजवरून प्रक्षेपण
- २४ मार्चपासून तीन दिवस ऑनलाईन पाहण्याची संधी
- दररोज सकाळी ११ ते १२ या वेळात
- पुन:प्रक्षेपण : सायंकाळी ७ ते ८

> बाणेर, पाषाण आणि भुकूम या भागातून वाहणाऱ्या आणि सातत्याने दुर्लक्षित राहिलेल्या १९ किमी. लांबीच्या राम नदीचा प्रवाह पूर्वीप्रमाणे शुद्ध व्हावा, ती अविरल व निर्मळ व्हावी या उद्देशाने गेली पाच वर्षे आम्ही काम करीत आहोत. अशा नद्या शांतताप्रिय आणि आनंदी समाज घडविण्यासाठी मदत करतील तसेच भावी पिढ्यांसाठी समृद्ध निसर्ग निर्माण करतील अशी धारणा आहे. नदीच्या पुनरूज्जीवनासाठी एक सर्वसमावेशक आणि शाश्वत प्रारूप तयार करण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणजे हा राम नदी महोत्सव आहे.
>
> **- वीरेंद्र चित्राव, संयोजक, किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सव.**

# शहराबाहेरील रुग्णांचा पालिकेच्या वैद्यकीय यंत्रणेवर ताण

## हद्दीबाहेरील 25 टक्के रुग्ण घेतात उपचार – राज्य सरकारने आर्थिक मदत करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय सेवा इतर महापालिकांच्या तुलनेने चांगल्या आहेत. शहरातील महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यासाठी ग्रामीण भागासह राज्यातील कानाकोपऱ्यातून रुग्ण दाखल होत असतात. बाहेरील रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असून यामुळे महापालिकेच्या वैद्यकीय विभागावर ताण येत आहे.

महापालिकेच्या रुग्णालयात २०२४ मध्ये बाह्यरुग्ण विभागात तब्बल १६ लाख १० हजार, तर आंतररुग्ण विभागात ८९ हजार रुग्णांनी उपचार घेतले आहेत. यामध्ये महापालिका हद्दीबाहेरील सरासरी २५ टक्के रुग्ण असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे. त्यामुळे हद्दीबाहेरील रुग्णांवर उपचार करण्यासाठी राज्य सरकारने महापालिकेला आर्थिक मदत करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकनानुसार १ हजार लोकसंख्येमागे ३ खाटा बंधनकारक आहेत. त्यानुसार ३० लाखांच्या लोकसंख्येला ९ हजार खाटा उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्यानुसार महापालिकेच्या रुग्णालयांत सोय केली आहे. वैद्यकीय विभागाने शहरातील आठ मोठ्या रुग्णालयांपैकी वायसीएम, आकुर्डी, भोसरी, जिजामाता आणि थेरगाव या पाच रुग्णालयांतील रुग्णांच्या आकडेवारीचा अभ्यास केला आहे. यामध्ये वायसीएम रुग्णालयामध्ये २०२४ मध्ये हद्दीतील बाह्यरुग्ण विभागामध्ये ६ लाख ६९३, आंतररुग्ण विभागात ३३ हजार ९९, हद्दीबाहेरील बाह्यरुग्ण विभागात १ लाख ३६ हजार २९९, तर आंतररुग्ण विभागात १३ हजार ३६६ रुग्णांनी उपचार घेतले आहेत.

महापालिकेच्या वतीने शहरातील वैद्यकीय सुविधा सुधारवण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. रुग्णालयांमध्ये दर्जेदार सोयी-सुविधा देण्यासाठी नवीन उपकरणे खरेदी करण्यावर भर दिला जात आहे. महापालिकेच्या चार रुग्णालयातील रुग्ण संख्येची टक्केवारीमध्ये आकडेवारी काढण्यात आली आहे. २०२४-२५ मध्ये आकुर्डी रुग्णालयात हद्दीतील (७७.१०), हद्दीबाहेरील (२२.२०), भोसरी रुग्णालयात हद्दीतील (६७.१०), हद्दीबाहेरील (३२.२०), जिजामाता रुग्णालय हद्दीतील (८०.१०), हद्दीबाहेरील (१९.९०), थेरगाव रुग्णालयात हद्दीतील (७१.६०), हद्दीबाहेरील (२८.४०) अशा प्रमाणे रुग्णालयात उपचार घेतले आहेत. महापालिका हद्दीबाहेरील सरासरी २५ टक्के रुग्ण असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे. त्यामुळे हद्दीबाहेरील रुग्णांवर उपचार करण्यासाठी राज्य सरकारने महापालिकेला आर्थिक मदत करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.




### वैद्यकीय सुविधांसाठी 500 कोटींचा खर्च

» महापालिकेच्या वतीने शहरातील वैद्यकीय सुविधा सुधारवण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. रुग्णालयांमध्ये दर्जेदार सोयी-सुविधा देण्यासाठी नवीन उपकरणे खरेदी करण्यावर भर दिला जात आहे. दरवर्षी महापालिका वैद्यकीय सुविधांसाठी सुमारे ५०० कोटी रुपयांचा खर्च करत आहे.

> “ महापालिकेच्या पाच मोठ्या रुग्णालयातील हद्दीतील व हद्दीबाहेरील रुग्णांच्या आकडेवारीचा वैद्यकीय विभागाने अभ्यास केला आहे. यामध्ये सरासरी हद्दीतील ७५ टक्के, तर हद्दीबाहेरील २५ टक्के रुग्ण महापालिका रुग्णालयात उपचारासाठी येत आहेत. त्याचा ताण महगापालिका रुग्णालयातील वैद्यकीय यंत्रणेवर आहे.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी- चिंचवड महापालिका**

# थकबाकीदार फ्लॅटधारक सोसायटी निवडणूकीस होणार अपात्र

## थकबाकीदारकांच्या शेअर सर्टिफिकेटवर चढणार मालमत्ताकराच्या थकीत रकमेचा बोजा !

**पिंपरी | प्रतिनिधी**

सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये फ्लॅट असणाऱ्या मालमत्ता कराचा भरणा न करणाऱ्या व्यक्तींवर अशी कार्यवाही करणे शक्य होत नाही. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये फ्लॅट असणाऱ्या व पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थकीत कर असणाऱ्या सभासदाच्या शेअर सर्टिफिकेटवर थकीत मिळकतकराची नोंद ठेवण्याबाबत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांना कळविण्याचा निर्णय पिंपरी चिंचवड महापालिकेने घेतला आहे. ही नोंद झाल्यानंतर हे थकबाकीदार फ्लॅटधारक सोसायटी निवडणूकीस अपात्र होणार आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत सर्वसाधारणपणे 6 हजार 644 इतक्या गृहनिर्माण सोसायट्या कार्यरत आहेत. या सोसायट्यामधील 77 हजार 886 इतक्या सदनिकाधारकांकडे फ्लॅटधारकांकडे 180 कोटीं इतक्या रक्कमेचा मालमत्ता कर थकित आहे. करसंकलन विभागाने यापुर्वीच शहरातील सर्व सोसायट्यांना कर थकित असलेल्या फ्लॅटधारकांची यादी सोसायटीचे अध्यक्ष व सचिव यांना पाठविली आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये फ्लॅट असणाऱ्या व पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थकीत कर असणाऱ्या सभासदाच्या शेअर सर्टिफिकेटवर थकीत मिळकतकराची नोंद ठेवण्याबाबत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांना कळविण्याचा निर्णय पिंपरी चिंचवड महापालिकेने घेतला आहे सर्व गृहनिर्माण सोसायटीचे सभासद नियुक्त संचालक मंडळ असते. सर्व सोसायट्या संबधित फ्लॅटधारकाला शेअर सर्टिफिकेट देते. व त्याची एक प्रत सोसायटी अध्यक्ष व सचिवांकडेसुध्दा असते. याशिवाय याची एक नोंदवही सुध्दा सोसायटीचे अध्यक्ष व सचिव यांचेकडे जतन केलेली असते. थकीत मिळकतकराची थकबाकीची नोंद संबंधित फ्लॅटधारकाच्या शेअर सर्टिफिकेटवर होण्यासाठी महापालिकेच्या वतीने सोसायटीचे अध्यक्ष व सचिवांना विनंती केली आहे. याबाबत गरज असलेस आवश्यक तो पत्रव्यवहार उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर क्र. 3 व 6, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयाशी केला जाणार आहे. त्यामुळे फ्लॅटचे हस्तांतरण होताना थकबाकी असलेस सोसायटीचे अध्यक्ष व सचिव यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा मालमत्ता कर भरल्याशिवाय ना हरकत प्रमाणपत्र देता येणार नाही.




### मालमत्ता कराचा भरणा 31 मार्च 2025 पूर्वी करावा

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा रहिवासी मालमत्तेपोटी 300 कोटी, बिगरनिवासी मालमत्तेपोटी 78 कोटी इतका मालमत्ताकर दि.15 मार्च 2025 अखेर वसुल झालेला नाही. रहिवासी मालमत्ताधारकांकडे अद्यापही मोठ्या प्रमाणात मालमत्ताकर थकीत आहे. आर्थिक वर्षाचे केवळ 15 दिवस शिल्लक राहिले असल्यामुळे आपण आपला मालमत्ताकर तात्काळ महानगरपालिकेकडे जमा करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

# सार्वजनिक उद्याने आता रात्री नऊ वाजेपर्यंत खुली

## वाढत्या उष्णतेमुळे शहरातील 220 हून अधिक उद्यानांची एक तास वेळ वाढवण्याचा पुणे महापालिकेचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असून शालेय सुट्ट्या सुरू असल्याने पुणे महापालिकेने सार्वजनिक उद्यानांची वेळ एक तास वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे पूर्वी रात्री आठ वाजता बंद होणारी उद्याने आता रात्री नऊ वाजेपर्यंत खुली राहणार आहेत.

महापालिकेच्या उद्यान विभागाचे प्रमुख अशोक घोरपडे यांनी 'सीविक मिरर'ला ही माहिती दिली. या निर्णयामुळे नागरिकांना, विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना, संध्याकाळच्या वेळेस थंड आणि आनंददायी वातावरणात रमता येणार आहे.

पुणे शहरात महापालिकेतर्फे व्यवस्थापित करण्यात येणारी २२० हून अधिक सार्वजनिक उद्याने आहेत. ही उद्याने नागरिकांसाठी आवश्यक विश्रांती आणि आरोग्यवर्धक ठिकाणे आहेत. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये येथे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. उन्हाळ्यात तापमान वाढल्याने बहुतांश नागरिक संध्याकाळी पाचनंतर उद्यानांकडे वळतात. पूर्वीच्या वेळेनुसार सकाळी सहा ते अकरा आणि संध्याकाळी चार ते आठ या वेळेत बागा उघड्या असत. मात्र नागरिकांना संध्याकाळचा अधिक वेळ मिळावा म्हणून आता रात्री नऊ वाजेपर्यंत उद्याने खुली ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

शहरात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असून शालेय सुट्ट्या सुरू असल्याने पुणे महापालिकेने सार्वजनिक उद्यानांची वेळ एक तास वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे महापालिका पुढील काळात उद्यानांचे आणखी नूतनीकरण करण्याचा विचार करत आहे. वार्षिक देखभाल निधीतून उद्याने सुधारण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्याचा मानस महापालिकेचा आहे. बसण्याची अतिरिक्त सोय, पाण्याच्या सुविधा आणि लँडस्केपिंगसाठीही योजना आखण्यात येत आहे, असे महापालिकेच्या उद्यान विभागाकडून सांगण्यात आले.



### उद्यान सुधारणा आणि सुरक्षा उपाययोजना

» पुणे महापालिकेकडून उद्यानांची देखभाल करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. विशेषतः मुलांच्या खेळाच्या ठिकाणी अधिक लक्ष दिले जात आहे. कारण उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये ही ठिकाणे अधिक वापरली जातात. पुणे महापालिकेने प्रत्येक उद्यानाची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र टीम नियुक्त केली आहे. यामध्ये खराब झालेल्या खेळण्यांची नोंद घेतली जात आहे. तसेच उद्यानांमध्ये सुरक्षेसाठी पुरेशी प्रकाशव्यवस्था आणि स्वच्छतेवरही भर दिला जात आहे. संध्याकाळच्या वाढीव वेळेत उद्याने अधिक प्रकाशमान राहावीत, यासाठी अतिरिक्त स्ट्रीटलाइट्स आणि दिवे बसवण्यात येत आहेत. स्वच्छता मोहिमा नियमितपणे राबवून उद्यानांचे सौंदर्य टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. "जनतेच्या तक्रारी व निरीक्षण अहवालाच्या आधारे तत्काळ दुरुस्ती केली जात आहे, जेणेकरून मुलांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होणार नाही," असे महापालिकेच्या उद्यान विभागाचे प्रमुख अशोक घोरपडे यांनी सांगितले.

### अहिल्यानगर अग्रक्रमावर

» या निर्णयाचे नागरिकांनी स्वागत केले आहे. रोजच्या कामाच्या व्यापातून बाहेर पडून थोडा वेळ उद्यानांमध्ये घालवण्याची संधी यामुळे उपलब्ध होणार आहे. ज्येष्ठ नागरिकांनाही संध्याकाळी अधिक वेळ फिरण्याचा पर्याय मिळणार असल्याने त्यांनी महापालिकेच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

"बागांच्या वेळेत वाढ झाल्यामुळे मुलांना बाहेर खेळण्याचा जास्त वेळ मिळेल. सध्याच्या काळात मोबाईल आणि स्क्रीन टाईम वाढत असल्याने अशा निर्णयामुळे मुलांना बाहेर खेळण्यास प्रवृत्त करता येईल आणि त्यांच्या आरोग्यासाठीही हे चांगले ठरेल..

- स्मिता झा, पालक

# शेती क्षेत्रात नविन तंत्रज्ञानचा वापर करुन चांगले उत्पादन घेऊ पण भाव मिळणे गरजेचा: खासदार सुप्रिया सुळे यांचे मत

## बारामती येथे ऊस उत्पादन ए. आय तंत्रज्ञानाचा वापर आणि साखर कारखाना परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदार संघात बारामती येथे ऊस उत्पादन ए. आय तंत्रज्ञानाचा वापर आणि साखर कारखाना परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला देशाचे माजी कृषी मंत्री शरद पवार आणि बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे यांची विशेष उपस्थिती लाभली होती.

बारामती कृषी विज्ञान केंद्रात ऑक्सफर्ड विद्यापीठ आणि मायक्रोसॉफ्ट यांच्या सहकार्याने सुरू असलेल्या एआय तंत्रज्ञान प्रयोगशाळेचे मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नाडेला आणि इलॉन मस्क यांनी केलेले कौतुक आनंद आणि आत्मविश्वास वाढवणार असल्याचे यावेळी बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. सध्याच्या काळात शेती क्षेत्रात नविन तंत्रज्ञानाचा वापर होणे आणि त्याला प्रोत्साहन मिळणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

आपण तंत्रज्ञानाचा वापर करुन चांगले उत्पादन घेऊ पण त्या उत्पादनाला चांगला भाव देखील मिळणे गरजेचे आहे, अशी एकप्रकारची मागणी त्यांनी केली. त्यामुळे सरकारने देखील यासाठी सहकार्य करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. आदरणीय पवार साहेब, प्रतापकाका पवार आणि राजेंद्र दादा पवार यांच्या प्रयत्नातून देशातील पहिली शेतीसाठीची एआय लॅब आपल्या बारामती बनली ही गोष्ट अभिमानास्पद असल्याचे सुळे यांनी आर्वजून सांगितले. यात विद्या प्रतिष्ठानचेही योगदान असल्याचे त्या म्हणाल्या.



### शेतकऱ्याची आत्महत्या वेदनादायी

» सरकारकडून ठिबकसाठी जे अनुदान मिळते त्याचे जवळपास ५०० कोटी थकलेले आहेत. त्यामुळे आपल्याला अनेक पातळ्यांवर काम करावे लागणार आहे, असे या परिषदेमध्ये सुप्रिया सुळे यांनी सांगितले. काल एका राष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या शेतकऱ्याने केलेली आत्महत्या वेदना देणारी असल्याचे त्या म्हणाल्या.

### शेतकरी हा केंद्रबिंदू म्हणून

» आपण तंत्रज्ञानाचा वापर करुन चांगले उत्पादन घेऊ पण त्या उत्पादनाला चांगला भाव देखील मिळणे गरजेचे आहे, अशी एकप्रकारची मागणी त्यांनी केली. त्यामुळे सरकारने देखील यासाठी सहकार्य करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. शेतीसंबंधित सर्व संस्थांनी एकत्र येऊन शेतकरी हा केंद्रबिंदू ठेवून काम करूया, असा निर्धार खासदार सुप्रिया सुळे यांनी यावेळी बोलून दाखवला.